MHYA210019612023

## निशाणी क्र.२ खाली आदेश

अर्जदारांनी कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ (थोडक्यात ‘ सदर अधिनियम’) चे कलम २३ अन्वये अंतरीम मदत मिळण्याकरिता सदरचा अर्ज सादर केलेला आहे.

२. अर्ज, शपथपत्र, कौटुंबीक घटना अहवाल निशाणी क्र.०८, अर्जदाराचे दायित्वाचे शपथपत्र, गैरअर्जदाराचा बचाव, निशाणी क्र.१३ व पटलावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले. अर्जदारांतर्फे श्री.एन.एम.चौधरी, विद्वान विधिज्ञ, तसेच गैरअर्जदारातर्फे श्री.ए.पी.टोंगे, विद्वान विधिज्ञ, यांचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जदारांनी सदर अधिनियमाचे कलम १२ अन्वये विहीत मागण्या मंजूर होण्याकरिता अर्ज सदर केला. सदर प्रकरण निकाली निघण्यापर्यंत अंतरिम मदत म्हणून आर्थिक आदेश मिळण्याकरिता सदर अर्ज अर्जदारांनी सादर केला. सदर अर्जाप्रमाणे गैरअर्जदाराकडून अर्जदार क्र.१ हिचेवर कौटुंबीक हिंसाचार झालेला आहे. सदर कौटुंबीक हिंसाचाराच्या कृत्यामुळे अर्जदार क्र.१ इतर अर्जदारांसह तिच्या माहेरी आश्रीत जिवन जगत आहे. गैरअर्जदार अर्जदारांचे पालनपोषणाकरिता, शिक्षणाकरिता तसेच तत्सम खर्चाकरिता कोणतीही आर्थिक मदत करीत नाही. गैरअर्जदाराचे सदर मदत करण्याची नैतिक तसेच कायदेशीर कर्तव्य आहे. करिता सदर अर्ज अर्जदारांनी सादर केलेला आहे.

४. गैरअर्जदार यांच्या बचावाप्रमाणे, नातेसंबंध त्यांना मान्य आहेत. परंतु अर्जदारांनी कथन केल्याप्रमाणे असा कोणताही कौटुंबीक हिंसाचार त्याने केल्याची बाब स्पष्टपणे नाकारलेली आहे. कोणत्याही कारणांशिवाय मागील तीन वर्षापासून अर्जदार क्र.१ स्वेच्छेने तिच्या माहेरी राहत आहे. नांदण्यास येण्याबाबत वारंवार विनंती तसेच प्रयत्न करुन देखील अर्जदार नांदण्यास टाळाटाळ करीत आहे. त्याबाबत गैरअर्जदाराने न्यायालयीन प्रकरण देखील दाखल केलेले आहे. सदर प्रकरणात अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रु.५,०००/- देण्याचा आदेश पारित करण्यात आलेला आहे. करिता सदरचा अर्ज खारीज करण्याची विनंती गैरअर्जदाराने केलेली आहे.

५. अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार हे पती-पत्नी आहेत. त्यांचा विवाह दिनांक १४.०५.२००६ मध्ये झालेला आहे. सदर वैवाहीक संबंधातून अर्जदार क्र.२ व ३ ही त्यांची कायदेशीर अपत्ये आहेत. या बाबतीत उभयपक्षात कोणताही वाद नाही. अर्जदारांच्या कथनाप्रमाणे, गैरअर्जदारास जुगाराचे व्यसन आहे. सदर व्यसनातून अनेकांकडून कर्ज घेणे, ते परत न करणे, त्याकरिता मालमत्ता विक्री करणे, पगारातील बहुतांश पैसा जुगारात तसेच

देणेदारांचे देणे देण्याकरिता वापरणे अशी अशी गैरअर्जदाराची सवय आहे. वेळोवेळी गैरअर्जदाराने सदर सवय सुधारण्याची शाश्वती देवून देखील सदर जुगाराची सवय संपुष्टात आली नाही. सदर जुगाराच्या पैशाची परतफेड करण्याकरिता अर्जदारावर तिच्या वडिलांकडून पैसे आणण्याचा तगादा वारंवार गैरअर्जदाराकडून करण्यात आलेला आहे. त्याकरिता नकार दिला असता वेळोवेळी मारहाण, शिवीगाळ, अर्जदार क्र.१ हिस करण्यात आलेली आहे. अर्जदारांच्या नित्याच्या गरजा, दवाखाना, औषधपाणी, मुलांचे शिक्षण, इत्यादी जबाबदा-या पार पाडण्यास गैरअर्जदाराने वेळोवेळी टाळाटाळ केलेली आहे. इच्छेविरुध्द बळजबरीने शारीरिक संबंध करणे, मुलांसमक्ष शारीरिक संबंधाकरिता बळजबरी करणे, त्यास नकार दिला असता मारझोड करणे, अशाप्रकारे अर्जदार क्र.१ चा लैंगिक छळ वेळोवेळी गैरअर्जदाराने केला. अर्जदार क्र.१ च्या चारित्र्यावर संशय घेत असे. नांदविण्यास नकार देत असे. अशाप्रकारे गैरअर्जदाराने अर्जदारांवर शारीरिक, मानसिक, भावनीक, आर्थिक तसेच लैंगिक स्वरुपाचा कौटुंबीक हिंसाचार केलेला आहे, असे अर्जदारांचे कथन आहे.

६. प्रथमदर्शनी सदर कथन विश्वासार्ह दिसून येते. अर्जदाराच्या कथनास कौटुंबीक घटना अहवाल निशाणी क्र.८ पुष्टी देतो. अर्जदारास सदर अर्ज चालविण्याकरिता आर्थिक मदत मिळणे आवश्यक आहे. अर्जदार क्र.२ व ३ ही शाळकरी मुले आहेत. त्यांच्या शिक्षणाकरिता खर्च येणे साहजीक असून सदर खर्चाची जबाबदारी गैरअर्जदाराची आहे. गैरअर्जदार वे.को.ली.मध्ये नौकरीस असून त्यास <u>एक लाख रुपये</u> पगार मिळतो असे अर्जदारांचे कथन आहे. त्याबाबत अर्जदाराने गैरअर्जदाराचे वेतन प्रमाणपत्र पटलावर दाखल केलेले आहे. त्याप्रमाणे माहे जून-२०२३ रोजीचे गैरअर्जदाराचा एकूण पगार रु.९९,४७९.२० आहे. गैरअर्जदाराने सदर वेतन नाकारले असून त्यांच्यावर आईवडिलांची जबाबदारी असल्याचे कथन केलेले आहे. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदाराचे वडील वे.को.ली.मध्ये नौकरीस असून गैरअर्जदाराचा भाऊ देखील नौकरीत आहे. त्यामुळे गैरअर्जदारावर कोणत्याही प्रकारची जबाबदारी दिसून येत नाही. अर्जदाराने तिचे दायित्वाचे शपथपत्र दाखल केलेले आहे, परंतु गैरअर्जदाराने सदर शपथपत्र दाखल केलेले नाही. माननीय सर्वोच्च न्यायालयाने **नेहा -विरुध्द- रजनिश** या प्रकरणात दिलेल्या न्यायनिवाडयाप्रमाणे सदर दायित्वाचे शपथपत्र देणे बंधनकारक असून न दिल्यास अर्जदाराचे प्रकरण खारीज करण्याचे किंवा गैरअर्जदाराचा बचाव रद्द करण्याबाबत माननीय न्यायालयाने स्पष्ट केलेले आहे. त्याप्रमाणे गैरअर्जदाराने घेतलेला बचाव सदर न्यायनिर्णयातील निर्देशाप्रमाणे विचारात घेता येवू शकत नाही.

७. अर्जदार हे गैरअर्जदाराची पत्नी व मुले आहेत. त्यांचे पालनपोषण करण्याची सर्वस्वी जबाबदारी गैरअर्जदाराची आहे. गैरअर्जदाराचे उत्पन्न पाहता सदर जबाबदारी पार पाडण्यास गैरअर्जदार सक्षम असल्याचे दिसून येते. अर्जदारास प्रकरण चालविण्याकरिता खर्च येणे अपेक्षीत आहे. दरम्यानचे काळात अर्जदारांना स्वतःचे पालनपोषण तसेच मुलांचे शिक्षण व इतर जबाबदा-या पार पाडण्याकरिता आर्थिक तरतूद आवश्यक आहे. अर्ज निकाली काढण्याकरिता वेळ लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्जातील कथन विचारात घेता, गैरअर्जदारास जुगाराच्या व्यसनातून मालमत्ता विक्री करण्याची सवय आहे. गैरअर्जदाराच्या मालमत्तेत अर्जदारांचा हक्क तसेच हितसंबंध आहे. गैरअर्जदार सदर मालमत्तेची विल्हेवाट लावून अर्जदारांच्या हक्कावर गदा आणण्याची शक्यता नाकारता येत

नाही. यास्तव, अर्जदार अंतरिम मदत मिळण्यास अंशतः पात्र आहेत. करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज निशाणी क्र.२ अंशतः मंजूर करण्यात येतो.
२. गैरअर्जदारास निर्देश देण्यात येते की, त्यांनी अर्जदार क्र.१ हिस तिचे पालनपोषण तसेच मुलभूत गरजा भागविण्यास दरमहा १५,०००/- रुपये, तसेच अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी दरमहा ५,०००/- प्रमाणे अंतरीम पोटगी खर्च सदर अर्ज निशाणी क्र.१ च्या दाखल तारखेपासून म्हणजेच दिनांक २९.०८.२०२३ पासून सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत दयावे.
३. गैरअर्जदारास वडिलोपार्जीत मालमत्तेची विल्हेवाट लावण्यापासून अंतरिम निकालापर्यंत प्रतिबंधीत करण्यात येते.
४. सदर आदेशाची प्रत अर्जदार, गैरअर्जदार संरक्षण अधिकारी व संबंधीत पोलीस ठाणे अधिकारी, यांना मोफत पुरविण्यात यावी.
५. येणेप्रमाणे सदरचा अर्ज नस्तीबध्द करण्यात येतो.

स्थळः वणी
दिनांकः२४.०१.२०२४

**(सुधीर म.बोमीडवार),**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
वणी.